Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

MARCH 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

B.Aadhar
Peer - Reviewed & Refereed Indexed
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

# SOCIAL JUSTICE AND COMMUNAL HARMONY

## IN SOUTH ASIA DURING THE LAST FIVE DECADES

Editors

Dr. Nilima Sarap | Dr. Arun Shelke
Dr. Piyush Nalhe | Asst. Prof. Dimple Mapari



This Journal is Indexed in
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 336 (CCCXIV)
ISSN : 2278-9308
March, 2022

# बंजारा स्त्री, कौटुंबिक हिंसाचार आणि समकालीन आव्हाने

प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड
समाजशास्त्र विभाग प्रमुख,शि.म. ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब,eshwarlaxman@gmail.com

**प्रस्तावना :**

भारत हा अनेक धर्म, भाषा, जाती, जमाती, पंथ व संस्कृती असणारा देश आहे. त्यातीलच बंजारा ही एक जमात आहे. भारतातील विविध राज्यांत बंजारा समाजाचे वास्तव्य आहे. प्राचीन काळापासून बंजारा जमातीचा व्यापार हा व्यवसाय राहिलेला आहे. म्हणून ही जमात मिठाचा आणि गव्हाचा व्यापार करणारी जमात म्हणून ओळखली जाते. परंतु नंतरच्या काळात दळणवळणाच्या प्रगत साधनांच्या विकासामुळे बंजाराचा व्यापार बंद झाला. बंजारा समाजाचा हा व्यापार बंद झाल्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले, यामध्ये महिलांना विविध सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागलेले दिसून येते.

पारंपारिक बंजारा समाजातील स्त्रीजीवन हे सांस्कृतिकदृष्टया समृध्द जरी असले तरी महिलांचे जीवनमान हे अत्यंत मागासलेले असल्याचे दिसून येते. विकास व शिक्षणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे परिवर्तन झालेले दिसून येत नव्हते. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या सामाजिक कार्यामुळे दिनदलित, भटके, जाती जमातीचे लोक व विशेष म्हणजे स्त्रियांना स्वावलंबी जगण्याचे स्वातंत्र्यच यांच्या कार्यामुळे मिळाले असे वाटते. कारण की, बंजारा सारख्या भटक्या जमातीचे लोक आणि त्यातही बंजारा स्त्रियांना शिक्षणाची ओळख देखील नव्हती. परंतु फुले दाम्पत्यांनी केलेल्या कार्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यानंतर का होईना, परंतु बंजारा समाजात व महिलांच्या जीवनात काही प्रमाणात शैक्षणिक बदल झालेला दिसून येतो. यामुळे बंजारा जमातीच्या महिलांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली. व याच दरम्यान तांडा, वाडी वस्तीवर शिक्षणाची चळवळ पोहचताना दिसून आली. परंतु समग्र समाजामध्ये स्त्रीविषयी असलेली पारंपारिक मानसिकता मात्र बदललेली दिसून येत नाही. यामुळे २१ व्या शतकात देखील बंजारा समाजातील महिलांना कौटुंबिक हिंसाचार आणि विविध आव्हानांना सामोरे जावे लागत असल्याचे दिसून येते.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1.बंजारा समाजातील महिलांचे जीवनमान समजून घेणे.
2.बंजारा समाजातील महिलांच्या २१ व्या शतकातील अस्तित्व जाणून घेणे.
3.कौटुंबिक हिंसाचारातून बंजारा महिलांचे होणारे शोषण समजून घेणे.
4.बंजारा महिला सर्वांगिण विकासापासून वंचित असल्याची कारणे व आव्हाने जाणून घेण्याचे प्रयत्न करणे.

**संशोधन पद्धती :**

शोधनिबंध हा संशोधनाचा एक महत्वाचा भाग असतो. ज्याप्रमाणे संशोधक हा एखाद्या समस्येचे सूत्रण करतो आणि निष्कर्षाप्रत जातो, त्याचप्रमाणे शोध निबंधात देखील एखादी समस्या निश्चित करुन त्या समस्येची कारणमिमांसा केली जाते. तसेच या शोध निबंधाच्या बाबतीत अध्ययन केलं आहे. कोणत्याही शोध निबंधासाठी तथ्य फार महत्वाचे असतात. तथ्य संकलन हे दोन पध्दतींने केले जातात. यामध्ये प्राथमिक आणि दुय्यम या तंत्राच्या सहाय्याने संशोधन अभ्यासाला लागणारी माहिती संकलित केली जाते. यामध्ये बंजारा समाजाचा घटक या नात्याने प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टींचा व घटनेचे विवेचन करीत आहे. तसेच संशोधन साहित्याचा आधार घेवून शोध निबंध मांडले जाणार आहे.



Scanned by CamScanner

बंजारा समाजातील स्त्री जीवन :

बंजारा समाजात कुटुंबपध्दती ही पितृसत्ताक असल्यामुळे स्त्रियांचे स्थान हे कुटुंबात दुय्यमच राहिलेले दिसते. कुटुंब प्रमुख म्हणून पुरूषाला अधिकार प्राप्त झाले आणि स्त्रियांना कुटुंबातील कामाची जबाबदारी देण्यात आली. पूर्वी बंजारा असेल किंवा इतर कोणत्याही समाजात कुटुंबातील सदस्यांची संख्या जास्त असायची. परंतु आजच्या काळात 'हम दो हमारे दो' याला विशेष महत्व असल्यामुळे शासनाच्या लोकसंख्या नियंत्रण धोरणानुसार लोकसंख्या काही प्रमाणात नियंत्रणात आणला आलेली आहे, याला बंजारा समाज देखील अपवाद नाही. असे असताना देखील आजही बंजारा स्त्री जीवनाचा आढावा घेतले असता, असे म्हणता येईल की, २१ व्या शतकात देखील स्त्रियांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहेत.

कौटुंबिक हिंसाचार :

देशातील कोणत्याही जाती जमातींचा किंवा प्रभुत्वशाली जाती समूहातील महिलांच्या समस्या वर्षानुवर्ष संपलेल्या नाहीत. समग्र समाजात महिलांना कोणत्या ना कोणत्या कारणाने छळाला सामोरे जावे लागते. समाज कोणताही असो जगाची व देशाची प्रगती होत असताना महिलांना मात्र कौटुंबिक हिंसेपासून अलिप्त राहता आलेले नाहीत. कारण की, पुरूषप्रधान संस्कृतीचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जो पर्यंत बदलत नाहीत, तोपर्यंत महिलांना स्वावलंबी जीवन जगता येणार नाहीत. म्हणून यासाठी महिलांवर होणारे शोषण थांबले पाहिजे.

बंजारा समाजातील महिलांचे शोषण पारंपारिक ते आधुनिक समाजात देखील होताना दिसून येतात. अनेक वर्षापासून भटकंती करणाऱ्या या समाजातील महिलांना वेगवेगळया समूहाच्या लोकांकडून व समाजातील लोकांकडून सामाजिक शोषणाला बळी पडावे लागत होते. आजही कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शहर व महानगरामध्ये काम करताना सामाजिक शोषणाचे बळी पडावे लागते. इतकेच नव्हे तर शारीरिक व मानसिक त्रास सहन करावे लागते. कुटुंबातील सदस्य हे व्यसनाधिन असेल तर त्या महिलांना जास्तीचे शोषण होत असल्याचे दिसून येते.

शासनाच्या वतीने महिलांसाठी कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणारा कायदा २००५ बनविला व २००६ मध्ये त्याची अमलबजावणी करण्यात आली. यामुळे महिलांना शारीरिक संरक्षण, मानसिक संरक्षण, आर्थिक संरक्षण, मुलांचा ताबा व रोजचा खर्च या बाबतीत संरक्षण देण्यात आले आहे.

कौटुंबिक हिंसाचार कायद्यामुळे शोषणग्रस्त व हिंसाचाराला बळी पडणाऱ्या महिलांना संरक्षण मिळते. महिलांचे प्रामुखाने शारिरीक छळ, लैंगिक अत्याचार, तोंडी आणि भावनिक अत्याचार, आर्थिक अत्याचार असे विविध हिंसात्मक कृत्य करून महिलांचे शोषण केले जाते. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचार कायद्यामुळे शोषणग्रस्त महिलांना संरक्षण दिले जाते. यामध्ये पिडित महिलांना न्याय, संरक्षण मिळू शकते. पिडित महिला तिच्या अथवा मुलांविरूध्द होणारे अत्याचार रोखु शकते. स्त्रीधन, दागदागिने, कपडे इत्यादीवर ताबा मिळवु शकते. संयुक्त खाते अथवा लॉकर हिंसा करणाऱ्या पुरूषास वापरण्यास प्रतिबंध करू शकते. पिडित महिला ज्या घरात राहते ते घर तिला सोडावे लागणार नाही. कौटुंबिक हिंसाचार करणाऱ्या पुरूषास स्त्री राहत असलेले घर विकण्यास प्रतिबंध करू शकते. कलम ४९८ अ अंतर्गत पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करता येते.

वरील सर्व बाबी स्पष्ट करण्याचे कारण की, आजही अनेक ग्रामीण भागातील महिलांना या संदर्भात विशेष कोणत्याही प्रकारची माहिती नसलेले दिसून येते. याला बंजारा समाजातील महिला देखील अपवाद नाहीत. कारण की, बंजारा समाजातील महिलांचे शिक्षणाचे प्रमाण हे अल्प असल्यामुळे शेती व शेतमजुरी तसेच भटकंती करून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणे, अनेक तांडयातून आजही ३० ते ४० टक्के लोक ऊसतोडीला जात असल्याचे दिसते. यामध्ये व्यसनाधिन



Scanned by CamScanner

असणारे, अत्यंत गरीब कुटुंब, कर्जबाजारी असणारे, आर्थिक मागासलेपणा असल्यामुळे, कुटुंबातील मुला–मुलींचे लग्न होत असल्यामुळे हे लोक ऊसतोडीली जात असतात. या कामगार लोकांच्या कुटुंबातील महिलांना कामाच्या ठिकाणी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. कामगार कुटुंबातील महिलांच्या समस्या, त्यांच्या सोबत असलेल्या त्याच्या मुलींच्या समस्या, महिलांच्या आरोग्याच्या समस्या, कुटुंबातील कर्ता पुरूषांकडून होणारे शोषण, व्यसनाधिनतेमुळे कुटुंबाची होणारी हानी. शारीरिक व लैंगिक छळ अशा अनेक समस्यांना महिलांना तोंड द्यावे लागत आहेत.

**बंजारा समाजातील महिलांवरील कौटुंबिक हिसांचाराची कारणे :**

महिलांवरील कुटुंबात होणाऱ्या अत्याचाराचा विचार केल्यास असे दिसून येते की, भारतातील प्रत्येक वर्ग, जात धर्मातील महिलांना कौटुंबिक हिंसाचारास सामोरे जावे लागते. याबाबतीत त्याची विविध कारणे आहेत. हेच बंजारा समाजात देखील घडताना दिसून येते.

- विवाहपूर्व व विवाहपश्चात होणाऱ्या आर्थिक मागण्या.
- पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे पुरूषांना असलेला अहंम.
- वैवाहिक भूमिकेशी व जीवनाशी होणारे असमायोजन.
- महिला काम करण्यासाठी बाहेर पडत असल्यामुळे महिलांच्या चारित्र्यावरील संशय.
- विवाहानंतर वंध्यत्व किंवा कुटुंबात मुलींचे प्रमाण जास्त असणे.
- सामाजिकरणाच्या उणिवेमुळे महिलांना कौटुंबिक अत्याचारास सामोरे जावे लागते.
- कुटुंबामध्ये व्यसनाधिनतेचे प्रमाण असल्यामुळे महिलांचे शोषण होत असते.
- स्त्रियांविषयी पुरूष मानसिकतेत असलेली नकारात्मक भूमिका.
- कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्यामुळे महिलांचे होणारे शोषण.

अशा प्रकारे बंजारा समाज असेल किंवा इतर कोणताही समाज, यामध्ये असणाऱ्या महिलांचे शोषण मात्र अजूनही थांबलेले दिसून येत नाही. म्हणून समग्र समाजात यासाठी जाणीव जागृती होणे व महिलांच्या विषयी असलेले चुकीचे विचार नकारात्मक भूमिका बाजूला करून महिलांना विकास प्रक्रियेत आणून परिवर्तन घडवून आणणे आवश्यक वाटते. यासाठी बंजारा समाजातील लोकांनी महिलांना प्रथमतः शिक्षित करणे गरजेचे वाटते.

**बंजारा समाजातील महिलांपुढील समकालीन आव्हाने :**

भारतीय राज्यघटनेने दिलेल्या हक्क, अधिकार व कायद्याच्या जोरावर समाजात महिला सबलीकरण, सक्षमीकरण व परिवर्तनाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. प्रत्येक क्षेत्रामध्ये महिला पुरूषांच्या बरोबरीने कर्तृबगारी करताना दिसून येते. महिला आपली वेगळी ओळख निर्माण करू लागली. परंतु हे प्रमाण भारतीय महिलेंच्या तुलनेत नगण्यच असल्याचे दिसते. अजूनही महिलांसमोर अनेक आव्हाने आहेत. त्यामुळे आजही महिला संपूर्णतः स्वावंबली झालेल्या नाहीत. तर याउलट महिलांना नियमितपणे विविध संकटाला सामोरे जावे लागत आहेत. आजही महिलांपुढे अनेक आव्हाने आहेत. या आव्हानाला तोंड देवून समग्र महिलांना विकसित करणे, विकासाच्या प्रक्रियेत आणणे अत्यंत गरजेचे आहे.

1.प्राचीन काळापासून ते आजपर्यंत प्ररूषप्रधान भारतीय समाजात स्त्रियांकडे भोगवादी दृष्टिकोनातूनच पाहिले जाते.

2.प्राचीन काळापासून स्त्री निरक्षरतेचे प्रमाण अधिक आहे कारण स्त्रियांना पुरूषप्रधान समाजात दुय्यम स्थान दिले गेल्यामुळे तिला शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला. अज्ञान, अंधश्रध्दा, दैववादाचा पगडा, अनिष्ठ रूढी परंपरा यांच्या चक्रव्युव्हात अडकलेल्या स्त्रियांच्या शिक्षणाकडे फारसे लक्ष दिले गेले नाही.

3.भारतीय समाजात स्त्री पुरूष विषमतेचे प्रमाण अधिक आहे.



Scanned by CamScanner

4.पुरूषप्रधान भारतीय समाजात पूर्वीपासून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण अधिक आहे.

5.बंजारा समाजातील महिलांना आजही शिक्षणापासून वंचित राहावे लागत असते.

6.बाहेरील विश्वात महिलांना असुरक्षितेची भिती मोठया प्रमाणात आहे.

7.बंजारा समाजातील असेल किंवा इतर कोणत्याही समाजातील महिलांना कौटुंबिक व सामाजिक समस्यांना तोंड द्यावे लागते.

8.भारतीय महिलांना व बंजारा समाजातील महिलांना विशेषत: स्त्री भ्रुणहत्या, विधवा, परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न, घटस्फोट, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या आव्हानाला नियमितपणे सामोरे जावे लागते.

**महिलांच्या परिवर्तनासाठी व हिंसाचारातून मुक्ती करीता उपाय :**

1.बंजारा समाजातील परिवर्तनासाठी पुरूषांबरोबर महिलांना शिक्षणात समान संधी मिळाल्यास काही काळानंतर समाजात उत्क्रांतीची दिशा पाहावयास मिळेल. यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे.

2.समाजातील पुरूषप्रधान मानसिकतेत परिवर्तन घडून आणणे अत्यंत गरजेचे आहे.

3.बंजारा समाज व इतर जाती जमातीच्या स्त्रियांना जागृत करून व महिला स्वत: जागृत होवून कौटुंबिक हिंसाचाराचा प्रतिकार केला पाहिजे तरच हिंसाचाराला आळा असू शकतो.

4.स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता, व्यक्ती म्हणून पाहण्याची प्रवृत्ती निर्माण करणे गरजेचे आहे.

5.महिलांच्या सुरक्षिततेसाठी लोकांच्या मानसिकतेत बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे.

6.स्त्रियांमध्ये स्व जागृती व अधिकाराबद्दल जागरूकता निर्माण करणे.

7.स्त्रियांना सामाजिक बंधनातून मुक्त करून स्वावलंबी जीवन जगण्याची संधी देणे.

अशा पध्दतीने स्त्रियांविषयी सकारात्मक विचार केल्यास भविष्यात निश्चित महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, हिंसाचार कमी झालेले दिसून येतील. भारतीय समाजातील सर्व जाती जमातीच्या स्त्रियांनी देखील पुरूषांवर अवलंबून न राहता स्वत: अर्थाजन करण्यासाठी सक्षम होणे, आपल्या कुटुंबाच्या सर्व गरजा भागविण्यासाठी व कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कार्य करणे गरजेचे आहे. बंजारा समाज देखील याला अपवाद राहणार नाही. उपरोक्त सर्व घटकाचे पालन झाले तर समाज परिवर्तनाला व महिलांच्या प्रगतीला चालना मिळालेली दिसून येईल.

**संदर्भग्रंथ :**


1.रेगे शर्मिला (२००६), महिला सबलीकरण संकल्पना व उपाय, योजना मासिक.

2.आहूजा राम (१९९४), सामाजिक समस्याऐ, रावत पब्लिकेशन, जयपुर.

3.राठोड रमेश (२०२०), बंजारा स्त्री, सुमन प्रकाशन, लातुर.

4.आगलावे प्रदिप (२०१५), सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

5.चव्हाण पंजाब (२००८), बंजारा हस्तकलेची शोकांतिका, गौरव प्रकाशन, अमरावती.


Scanned by CamScanner